# अधिसूचना कलम १९

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
क्र. १६ सातारा यांचे कार्यालय
सातारा दि. ०८/११/२०१७

क्रमांक भूसं/१६/एसआर- **७१७** ज्या अर्थी समुचित शासन असलेल्या सातारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्यामार्फत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १६ सातारा यांनी भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळणयाच्या आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना, कलम ११ राजपत्र **दि. २२ ते २८ सप्टेंबर २०१६** अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भारण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी **सातारा** (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये कोणत्याही खातेदारांचे आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १६ सातारा,** तालुका सातारा, जि. सातारा यास (अधिसूचना काढण्यापूर्वी अधिकाऱ्यांचे नाव व पत्ता नमुद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची- एक

### संपादित करावयाचे जमिनीचे वर्णन

### गावाचे नाव- शहापूर, ता. कोरेगाव, जि. सातारा

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | | अंदाजित क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| | जुना गट नं. | नवीन गट नं. | |
| १ | १०२ पै. | २ पै. | ०.१५ |
| २ | ३९७ पै. | ३ पै. | ०.३४ |
| ३ | १०३ पै. | ४ पै. | ०.१५ |
| | | **एकूण :-** | **०.६४** |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- वसना उपसा सिंचन योजना

**प्रकल्पाचे कामाचे वर्णन** :- वसना उपसा सिंचन योजना टप्पा क्र.२ अंतर्गत वितरण हौद क्र. २ व पोहोच रस्त्यासाठी लागणारे क्षेत्र

**समाजाला होणारे लाभ : -**

**अ)** या प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये बारमाही पाण्याची सोय होणार असल्याने तसेच वितरण हौदापर्यंत जाणे-येणेसाठी व त्याची डागडूजी करण्यासाठी लागणाऱ्या रस्त्याची सोय होणार आहे. तसेच सिंचन योजनेमुळे लाभ क्षेत्रात नगदी पिके घेणे शक्य होऊन लोकांचा आर्थिक, सामाजिक स्तर उंचावून विकास दर वाढणार आहे.

**ब)** प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पीक क्षेत्रामध्ये वाढ होणार असलेने स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**क)** प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये ऊसासारख्या नगदी पिकामुळे साखर कारखानदारीत लाक्षणिक वाढ संभवते, तसेच पाण्याच्या नियमित उपलब्धतेमुळे कृषी आधारित विविध उत्पादन प्रक्रिया व कारखानदारीस चालना मिळणार आहे.

## अनुसूची- तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

### गावाचे नाव- शहापूर, ता. कोरेगाव, जि. सातारा

संपादन करणेत येणाऱ्या क्षेत्रामध्ये जमीन येत असल्यामुळे गावठाण विस्थापित होत नाही. बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

## अनुसूची- चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

सदरचा प्रकल्प ग्रामीण पायाभूत सुविधा अंतर्गत येत असल्याने त्यास भूसंपादन अधिनियम, २०१३ आणि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १३ मार्च २०१५ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रानुसार सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट देण्यात आली आहे.

## अनुसूची- पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : - लागू नाही

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : - प्रश्न उद्‌भवत नाही

क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील : - प्रश्न उद्‌भवत नाही

**टीप :-** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसपांदन) क्र. १६ सातारा या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येऊ शकेल.

दिनांक : ०८/११/२०१७
ठिकाण : सातारा

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सत्यमेव जयते क्रमांक १६, सातारा

(श्रीमती मंजुषा मिसकर)
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**क्र. १६ सातारा**